# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  ३०/०४/२०२४

- दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र 407/24 कलम 324 भादंवि | शिव मंदीर समोरील जेल कॉर्टर रोडवरील गुपचुप गाडीच्या बाजुला अमरावती | 29.04.24 चे 21.00 वा<br><br>दा ता वेळ 30.04.24 चे 02.30 वा. | तन्मय विजय तायडे वय 16 वर्ष रा जेल कॉर्टर बस स्टॉप जवळ इंगळे यांचे घरी भाडयाने अमरावती | मिथीलेश तायडे वय 16 वर्ष रा जेल कॉर्टर परिसर अमरावती | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी  नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी याचा काही दिवसापुर्वी त्याचा मित्र नामे मिथीलेश तायडे याचेसोबत किरकोळ वाद झाला होता. त्याच कारणावरुन दि 29.04.24 रोजी फि हे जेल कॉर्टर येथील शिव मंदीर समोरील रोडच्या कडेला असलेल्या गुपचुपच्या गाडीवर गुपचुप खाऊन घरी जाण्यास निघाला असता त्या ठिकाणी मिथीलेश आला  व त्याने फिर्यादीचे डोक्यावर पाठीमागे त्याच्या उजव्या हातातील स्टिलचे कडे फिर्यादीचे डोक्यावर मारले त्यामुळे डोक्यावर मार लागुन जखम होऊन रक्त निघाले अशा फिर्यादीचे रिर्पोटरवरुन सदरचा गुन्हा दखल |
| ०२ | बडनेरा अप नं. ३०२/२४ कलम ३२४, ५०४, ३४ भादवी | अमरावती | घ ता वेळी दि. २९/४/२४ चे १७/४५ वा<br>दा ता वेळी दि. ३०/०४/२४ चे ००/५२ | एक महिला | १) एक महिला<br>२) आनंद जगन दाभाडे वय २० दोन्ही रा कोल्हा काकडा ता अमळापुर जि अमरावती<br>३) विक्की गुडधे वय २८ वर्ष<br>४) बाबुलाल गुडदे वय ५५ वर्ष दोन्ही हातुर्णा पुर्नवसन ता भातकुली जि अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि चे पती हे अंगणात बाजीवर बसले असता व फि. अंगण झाडीत अशतांना चारही आरोपी हे तेथे आले व आरोपी क्रं. १ हिने फि स मह्टले की, तुला जागा मिळणार नाही असे फि व फि चे पती सोबत वाद करुन शिवीगाळ केली व आरोपी क्रं. ३ याने अंगणातील दगड हातात घेवुन फि चे पतीचे डोक्यावर मारुन जख्मी केले त्यामुळे फि चे डोक्यातील रक्त निघत होते हे पाहुन चारही आरोपी हे तेथुन पळुन गेले अशा फिर्यदीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा कलम ३२४, ५०४, ३४ भादवी प्रमाणे दाखल |
| ०३ | बडनेरा अप नं. ३०३/२४ कलम ३२४, ५०४,५०६ ३४ भादवी | अमरावती | घ ता वेळी दि. २९/४/२४ चे १८.०० वा<br>दा ता वेळी दि. ३०/०४/२४ चे ०२/३८ वा | एक महिला | १)दादाराव पांडुरंग गुडधे वय ५५ वर्ष<br>२) एक महिला<br>३) वैभव गुडधे वय २५ वर्ष<br>४) गौरव वय २३ वर्ष सर्व रा हातुर्णा पुर्नवसन ता भातकुली जि अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी फि व फि चा चुलत भाऊ हे आरोपीचे घरासमोरुन जात असतांना आरोपी क्रं. २ हिने फि स पाहुन शिवीगाळ केली व वडीलांचे नावाने असलेला प्लॉट वरुन वाद घातला तेव्ही चारही आरोपीने फि व फि चे चुलत भावास शिवीगाळ केली व आरोपी क्रं. २ हिचे जवळ असलेल्या प्लॉस्टीक चे कडक पाईपने फि चे पायावर  झोडपे मारले त्यामुळे फि हे खाली पडले तेव्ही तिन्ही आरोपी ने फि स थापडा बुक्यांनी मारहान केली व पुन्हा मारण्याची धमकी दीली. अशा फिर्यदीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टी वरुन सदरचा गुन्हा कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | भादवी प्रमाणे दाखल |
| ०४ | पोस्टे राजापेठ २४७/२४ कलम ३२४,५०४, ५०६ भादवि | सुर्योद्य चौक रेल्वे स्टेशन जवळ अमरावती | दि ३०/०४/२०२४ चे ०८-०० वा. ते ०८-३० वा. दरम्यान<br><br>दाखल ता वेळ- दि.३०/०४/२४ चे १३-१८ वा | श्रीकांत भिमराव गेडाम वय ३३ वर्ष धंदा हातमजुरी रा. दरोगा प्लॉट साईप्रस्थ मंगल कार्यालयाचे मागे अमरावती | संदिप नावाचा इसम आडनाव माहीत नाही . | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे सुर्योद्य चौकात खंब्याजवळ बसला असता तिघेजन गाडीवर आले व नमुद आरोपी गाडीवरून खाली उतरला व फिर्यादीस म्हटले की, तु त्या दिवशी कशाला मध्यस्ती करत होता. तु त्या दिवशी वाचला असे म्हणुन आरोपीने त्याच्या हातातील कड्याने फि. च्या डोक्यावर मारल्याने डोक्यातुन रक्त निघाले. फि. ने समजाविण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने मारहान केली व शिवीगाळ करून तुला बघुन घेतो अशी धमकी दिली. अशा फि.च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा नोंद |
| ०५ | पो .ठाणे खो अप क्र १२२/२०२४ क.३०७,३२३, ५०६,१४३, १४७, १४८,१४९ भादवी | अमरावती | २९/४/२४ चे ०९.३० (रात्री ) दाखल ३०/४/२४ चे ०८.४१ वा | एक महिला | १. एक महिला,<br>२. एक महिला<br>३.तुषार देशमुख (बंड ) ,<br>४.प्रणव देशमुख (बंड )<br>५.अरविंद देसमुख (बंड ) व दोन मित्र नाव माहीत नाही सर्व रा दहिसाथ अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फि ही जेवण करुन घरा समोर उभी असता यातील आरोपी क्र १ व २ हा फि ला पाहुन हसत होता व तु फार गरीब आहे असे म्हणुन हसत होते फि ने त्यांना तुम्ही माझ यावर का हसत आहे यावरुन हटकले असता यातील आरोपी क्र १ व २ याने शिवीगाळ केली व वाद करु भांडण करुन मारहन केली व त्या भांडणामध्ये लोंबाझोंबी झाली व फि चे कपडे फाटले भांडण सोडवण्यास फि चे पती आले व त्यांनी भांडण सोडविले व भांडण झाल्यावर आरोपी क्र ३,४,५ व त्याचे काही मित्र व झगडा तो होगा हम और कुछ लडके लेके आते असे म्हणुन निघुन गेले नंतर काही वेळेने फि चे घराचे दार वाजविले असता फि चे पती यांनी दार उघडले असता दारात आरोपी क्र ३,४,५ व त्याचे २ मित्र होते त्यांनी फि चे पतीला घराचे दाराबाहेर फरफटत ओडले व आरोपी क्र ३ व ५ यांनी हात पकडुन आरोपी क्र ५ याने त्याच्या जवळील चाकु काढुन फि चे पतीला जीवे मारण्याच्या उद्देशाने डाव्या पसलीला चाकु मारला त्यामुळे जखम होवुन रक्त निघत होते अशा फि चे बयाण व मोडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा नमुद कलमा नुसार दाखल |
| ०६ | पो स्टे खो 123/2024 क 324,323, 504 506,34 भादवी | अमरावती | ३०/४/२४ चे ११.०० वा दाखल ३०/४/२४ चे १४.५९ वा | एक महिला | १- एक महिला<br>२) एक महिला<br>३) कैलाश रमेश अंभोरे वय २५ वर्ष सर्व रा गांधी आश्रम अम | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी व आरोपी हे एका चा मोहल्यात सेजारी राहणारे असुन नातेवाईक आहे फि चे वडिलांनी त्यांचे भांडण मिटत नसल्याने हिस्से वाटणी करण्याबाबत सल्ला दिला असता यातील आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीचे वडिलांचे हातावर वीट मारुन जख्मि केले तर फि ने म्हटले की वीट कायले मारली तर आरोपीतांनी फिर्यादीला सुद्धा थापडाबुक्यांनी मारहान केली व शिवीगाळ करुन मारण्याची धमकी दिली अशा फि चे जबानी रिपोर्ट व मेडी सर्टि वरुन सदरचा गुन्हा दाखल |

➢ जबरी चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे फ्रेजरपुरा अप क्र 406/24 कलम 392 भादंवि | अमरावती | दि 29.04.24 चे 17.50 वा.<br><br>दा ता वेळ 30.04.24 चे 00.13 वा. | एक महिला | अज्ञात | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे नमुद घ ता वेळी व ठिकाणी खाण्याचे पान आणण्याकरीता मोती नगर चौक येथे गेली होती दुकानामधुन खाण्याचे पान घेतले व घरी कॉलनीतील रस्त्याने येत असतांना गजानन शामराव शिरभाते यांचे घरासमोर मोती नगर रस्त्याने पायदळ येत असतांना सायंकाळी 05.50 वा एक अनोळखी इसम हा फि चे मागुन पायदळ आला व त्याने फि चे गळयातील सोन्याचा गोप 15 ग्रॅम वजनाचा कि अं 60,000/- रु फि चे गळयातुन जबरदस्तीने ओडुन हिसकावुन तोडुन घेतला व तो अनोळखी इसम हा फि चे घरासोर किशोर क्लॉथ स्टोअर्स समोरुन पळुन गेला फि हे जोरजोराने आरडाओरड केली परंतु गल्लीमध्ये कोणीही नव्हते तो अनोळखी इसम पायदळ धावत पळुन गेला तो अनोळखी इसम वय अंदाजे 50 वर्षाचा होता त्याने काळया रंगाचा फुल पॅन्ट पांढ-या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट होता रंग सावळा गोल चेह-याचा अशा वर्णनाच्या इसमाने फिर्यादीचे गळयातील सोन्याचा गोप 15 ग्रॅम वजनाचा हिसकावुन तोडुन चोरुन नेला अशा अशा फिर्यादीचे रिर्पोटरवरुन सदरचा गुन्हा दखल |

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ४२०/२०२४ कलम ३७९ भादवी | अमरावती | घतावेळ दि ३१.३.२०२४ चे १८.३० वा दरम्यान<br>दि ३०.४.२०२४ चे १३.२६ वा | एक महिला | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी यातील फिर्यादी ही राहुल खबकर हे भरती असल्याने बघण्याकरिता गेले असता त्यांनी त्याची गाडी अँक्टिव्हा ३जी क्र एम एच २७ बी एस ४९१६ किं अं १५००० रु ची गेट मध्ये लावुन गेली व परत आल्यावर बघितली असता दिसुन आली नाही कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेली.वरून सदर चा गुन्हा दाखल |
| ०२ | पोस्टे गाडगेनगर अमरावती अपक्र ४२१/२०२४ | पीडीएमसी गेट बाहेर अमरावती | घतावेळ दि २९.०४.२०२४ चे ०७.०० वा दरम्यान | विष्णु चंपत तायडे वय ६७ वर्ष रा लक्ष्मी नगर अमरावती | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे भिवापुर रोडवर कापडाचा खोक्यामध्ये रेडिमेट कापड विकण्याचा व्यवसाय करित असुन नमुद घतावेळी व ठीकानी यातील फि हे खोक्याला कुलुप लावुन घरी गेले व आज रोजी सकाळी खोका उघडण्याकरिता आले असता खोक्याला कुलुप लावुन दिसले नाही खोक्यामध्ये ठेवलेले लेडिज दुपट्टे,टॉप,लँगीग,पुरुषाचे टि शर्ट,बरमुडे ,लोअर,दुपट्टे असा एकुण १५००० रु चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेला.वरून सदर चा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कलम ३८० भादवी | | दि ३०.४.२०२४ चे १४.०८ वा | | | |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ<br>माहिती ता.वेळ<br>गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | बडनेरा अप नं ३०४/२४ कलम १८८ भादवी सहकलम १३५ म.पो अधी | कमलीवाले बाबा दर्गा समोरील सार्वजनिक मैदान जुनी वस्ती बडनेरा | घ ता वेळ - दि. २९/४/२४ चे २२/१५ वा ते दि. ३०/४/२०२४ चे ०२.१२ वा<br>दा ता वेळ - दि. ३०/४/२४ चे ०४.१६ वा | सर तर्फे पोउपनी सुरेन्द्र पाटील पो स्टे बडनेरा अम शहर | १)मजहरखान अफसर खान २) अब्दुल समीर अब्दुल मजीद ३) शेख अजीम शेख लाल तिनही रा अलमास कॉलनी जुनी वस्ती बडनेरा ४) अब्दुल सत्तार शेख कादर रा नुर नगर जुनी वस्ती बडनेरा ५) अबदुल खलील अब्दुल रहेमा रा इस्लामी चौक जुनी ववस्ती बडनेरा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी यांनी दि. २९/४/२४ चे २२/१५ वा पासुन कार्यक्रम सुरु करुन दि. ३०/४/२४ चे ०२.१२ वा प्रर्यंत सार्वजनिक ठिकाणी लाऊड स्पिकर वाजवुन कार्यक्रम चालु ठेवले तसेच आयोजक यांना नमुद परवानगी मध्ये दिलेल्या शर्ती व अटीचे उल्लंघन केले आहे. तसेच वर नमुद अध्यक्ष व पदाधिकारी यांनी मा पोलीस आयुक्त अमरावती सा यांचे आदेश क्रं. पोआअ/विशा /कावसु/१६५५/२०२४दि. २०/४/२०२४ रोजी कार्यक्रम संबधाने दि. २१/४/२०२४चे ००/०१ ते दि. ०५/०५/२०२४ चे २४.०० वा पावेतो लागु असलेल्या कलम ३७(१)व ३७(३)मपोकानुसार जारी केलेल्या आदेशाचे तसेच आयोजक यांना दिलेल्या अटी व शर्तीच्या परवानगीचे उल्लंघन केले करिता वर नमुद आरोपी यांचे विरुध्द कलम १८८ भादवी सहकलम १३५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार गुन्हा दाखल |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोस्टे गाडगेनगर अमरावती | अपक्र ४१९/२०२४ कलम ६५ई म दा का | अमरावती | दि ३०.४.२०२४ चे ०१.०० वा म | दि ३०.४.२०२४ चे ०३.०२ वा | पोहेका सुभाष पाटील बनं १२८० पोस्टे गाडगेनगर अम | एक महिला | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घतावेळी व ठीकानी गुप्त माहीती वरून स्टाफ चे मदतीने नमुद घतावेळी व ठीकानी रेड केला घातला असता एक महिला आरोपी हि अवैदयरित्या दारु विक्री करित असतांना मिळुन आली सदर महिलेच्या ताब्यातुन एका खाकी रंगाचा बॉक्स मध्ये १०० नग देशी दारु बॉबी संत्रा कंपनीच्या बॉटल ९० मीली कि अ ४००० रु चा माल मिळुन आला. वरून सदर चा गुन्हा दाखल |